
ISSN 2320 - 4494
RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

Volume : I Special Issue April - 2017



ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION | MANAGEMENT | MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | SOCIAL SCIENCES | PHYSICAL EDUCATION | JOURNALISM | PHARMACY

Editor

**Sarkate Sadashiv Haribhau**

Email : powerofknowledge3@gmail.com, shsarkate@gmail.com

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | काया मातीत मातीत मधील कवितांचे स्वरूप | प्रा. डॉ. रविकांत शिंदे | ९८ |
| २७ | भारतीय समाज आणि स्त्री प्रश्न | प्रा. डॉ. राजेंद्र रामकृष्ण सांगळे | १०२ |
| २८ | सदानंद देशमुख यांच्या कांदबरीतील पुरुषांचे चित्रण | प्रा. डॉ. गायकवाड बबन | १०७ |
| २९ | मराठी कवितेतील जागतिकीकरण | प्रा. डॉ. शंकर वाघमारे | ११० |
| ३० | खेळाचे मानसशास्त्र | प्राचार्य डॉ. विश्वास कदम | ११४ |
| ३१ | मौद्रिक धोरण आणि भाववाढ नियंत्रण | डॉ. ढास डी.के. | ११७ |
| ३२ | सेवाकर ते जीएसटी कररचनेतील बदलाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | प्रा. डॉ. प्रशांत एन. देशमुख | १२१ |
| ३३ | वस्तु व सेवा कर आढावा | प्रा. डॉ. भगवान सांगळे | १२७ |
| ३४ | प्रा.मे.पुं.रेगे यांचे तात्विक चिंतन | डॉ. संजय ह. पाटील | १३१ |
| ३५ | राजर्षी शाहू महाराजांचे प्रशासन | डॉ. सटाले सिध्देश्वर नामदेव | १३८ |
| ३६ | महात्मा गांधी यांचे अहिंसासंबंधी विचार | श्री. समाधान विठ्ठल लोंढे | १४१ |
| ३७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास | श्री. बिरंगळ भरत गोरखनाथ | १४४ |
| ३८ | स्वतंत्र विदर्भाबाबत राजकीय पक्षांच्या भूमिका | माधव चोले | १४८ |
| ३९ | माडीया गोंड आदिवासींचे लोक-नृत्यगीत आणि समाजशास्त्रीय दृष्टीकोन | प्रा. डॉ. सुरेश वि. धनवडे | १५१ |
| ४० | महाराष्ट्रातील विज निर्मितीचे स्त्रोत, प्रगती, वापर, समस्यचे आर्थिक अध्ययन : २००७-०८ ते २०१२-१३ | DR. S. G. Vaidya | १५६ |
| ४१ | The Study of Institutional Finance in Maharashtra | Prof. V.S. Kshirsagar | १६२ |
| ४२ | Water Quality Assessment for Physico-Chemical Analysis in Ahmednagar City | Dr. Mrs. S. R. Deshmukh | १६५ |
| ४३ | महाराष्ट्रातील आदिवासी लोककला | प्रा. डॉ. एम. बी. धोंडगे | १६८ |
| ४४ | डाळींब बागेचे व्यवस्थापन | प्रा. श्रीमती टेकाडे मंगल शांतीनाथ, कॅप्टन डॉ एम.जी.राजपंग | १७० |
| ४५ | राजज्ञा का पालन करने के लिए समर्पित शरीर गांधारी | डॉ. पुष्पा गोविंदराव गायकवाड, | १७६ |
| ४६ | मराठी भाषा अभ्यासातून मिळणाऱ्या नव्या संधी | डॉ. जयदेवी पवार | १८० |
| ४७ | बीड जिल्हयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे समाजशास्त्रीय अध्ययन - विशेष संदर्भाने गेवराई तालुका | प्रा. डॉ. तंगलवाड दत्ता माधवराव | १८३ |
| ४८ | मराठी साहित्य आणि मराठी चित्रपट - संबंध | प्रा. रमेश बा. रिंगणे | १८८ |
| ४९ | लोकसंख्या नियंत्रणात कुटूंब कल्याण कार्यक्रमाचा चिकित्सक अभ्यास | डॉ. भगवान डोंगरे | १९० |
| ५० | केंद्रिय अंदाजपत्रकातील महिलांसाठी तरतुदी | प्रा. महाजन संजय बाबूराव | १९४ |
| ५१ | Child Malnutrition: A Horrible Problem in India | Mr. Manal Bhagwan Suresh | २०४ |
| ५२ | भारत मे जनसंख्या नियंत्रण का प्रयास | प्रा. विद्या जगन्नाथराव भिल्लारे | २०९ |
| ५३ | व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'माणदेशी माणसे' मधील शोषिकता | प्रा. डॉ. बाळासाहेब एस. चव्हाण | २११ |
| ५४ | शेतकऱ्यांच्या समस्या निर्मुलनात शासनाची भूमिका | डॉ. शंकर लेखन | २१५ |
| ५५ | Antibacterial activities of marine polychaetes Lumbrineris hetropoda | Vaidya V. V. | २१९ |
| ५६ | Parent - Child Relationships in the novles of Toni Morrison | Aniket Bhuyar | २२४ |

# प्रा.मे.पुं.रेगे यांचे तात्विक चिंतन

डॉ. संजय ह. पाटील
(तत्वज्ञान विभागप्रमुख)
देगलूर महाविद्यालय, देगलूर.

प्रा.मे.पुं.रेगे : हे तत्वज्ञानाचे प्राध्यापक आहेत व ते एक अत्यंत बुध्दीमान तत्वजिज्ञासू असे समाज चिंतक आहेत. मराठीतील नवभारत या मासिकाचे कार्यकारी संपादक म्हणून ते कार्य करतात. मुंबईच्या कीर्ती महाविद्यालयात ते तत्वज्ञानाचे प्राध्यापक होते. पाश्चात्य नीतीशास्त्राचा इतिहास हे त्यांचे एक पुस्तक सर्व मराठी वाचकांच्या परिचयाचे आहे. त्यांनी वेळोवेळी परिसंवादात वाचलेले त्यांचे निबंध अनेक मराठी व इंग्रजी अशा दोन्ही मासिकातून प्रसिध्द झालेले आहेत. क्वेस्ट, ह्युमॅनिस्ट रिहयु इंडियन फिलॉसॉफिकल क्वाटरली इत्यादि मासिकातून त्यांचे लेखन प्रसिध्द झालेले आहे. ह्या प्रसिध्द झालेल्या त्यांच्या लेखांचे स्वरुप परि शिक्षणात्मक, चरित्ररेखा स्वतंत्र लेखन, सर्व सामान्य लेख असे आहे. त्यांच्या परिक्षणात्मक लेखनात त्यांच्या प्रतिभेची झेप, विषयाचे सांगोपांग ज्ञान, अत्यंत रेखीव विचार, सुव्यवस्थित विषय मांडण्याची पध्दती, त्यांना मान्य नसलेली वादग्रस्त विधाने अत्यंत तर्कशुध्द रीतीने पूराव्यासहित कशी चूक आहेत हे सांगताना त्यांच्या बुध्दीला विलक्षण धार येते. अशा वेळी सूक्ष्म बारकावे दाखवून त्यात ग्राह्य असलेल्या अंशाचे ग्रहण करणे, आणि जर विश्लेषण अपुरे किंवा योग्य पुराव्याच्या निकषावर टिकणारे नसेल, तसेच लेखकाने जर प्रामाणिकपणे विषय मांडण्याचा प्रयत्न केला नसेल, आणि वस्तूनिष्ठ मांडणी केलेली नसेल, आणि अपुऱ्या माहितीच्या आधारे काही विधाने केलेली असतील तर मात्र रेगे यांच्या लेखणीला विशेष छन्दी व उपहासाचे रुप येते. त्यांचे खंडण-मंडण चालू असते. ते केवळ टीका करताना विध्वंसक भूमीका घेत नाहीत. तर अशा वेळी त्या विषयाची व्याप्ती, विकास व मर्यादा स्पष्ट करून व त्यांचे प्रस्तुत विषया संबंधीचे मत व्यक्त करीत. एखाद्या विषयाला त्यांच्या बुध्दीचा स्पर्श झाला म्हणजे तो विषय त्याच्या बुध्दीच्या कक्षेतून सुटू शकत नाही. हे त्यांचे वैशिष्ट्य डोळयांत भरण्यासारखे आहे. हे त्यांचे वैशिष्ट्य पाहावयाचे असेल तर कोणताही लेख वाचल्यास त्यांचा प्रत्यय येईल. वरील गुण त्यांच्या कोणत्याही लिखाणात दिसून येतात.

तत्वज्ञान म्हणजे विश्वाकडे पाहण्याचा एक विवक्षित दृष्टीकोण तत्वज्ञानाला विश्व कसे दिसले यांचे दर्शन तत्वज्ञानात असते. विश्वाचे स्वरुप काय आहे, माणसाच्या प्रकृतीचे स्वरुप काय आहे, त्याचा विचार तत्वज्ञानात केला जातो. भारतीय तत्वज्ञानाला घ्दर्शनङ हा शब्द वापरतात. दर्शनाची आपण जर बुध्दीने परीक्षा केली तर सुसंगती आढळते. हा संबंध विचार वैचारिक शिस्तीने बांधलेला असतो त्यास तत्वज्ञान किंवा दर्शन ही संज्ञा आहे. दर्शन म्हणजे माणसाला असे दिसणे, असे जाणवणे असे दर्शन मानवी अनुभवावर आधारलेले असते. जो विषय अनुभवाच्या कक्षेत येत नाही त्याचे अस्तित्व आहे असे मानवाला पुरेसा आधार नसतो. अनुभवाला तर्कशास्त्र विज्ञान याची शिस्त सांभाळावी लागते.

तत्वज्ञ एका विविक्षित क्षेत्रात मुलभूत संकल्पनाची बांधणी करुन विश्वाच्या वास्तविक स्वरुपाचा उलगडा करण्याचा प्रयत्न करीत असतो. कोणत्याही विश्व विषयक तार्किक उपपत्तीस विज्ञानाच्या प्रस्थापित ज्ञानाच्या निकषावर पारखून घ्यावे लागते. जर ती उपपत्ती त्या ज्ञानाच्या निकषावर टिकून राहत असेल तर ती ग्राह्य समजावी. तर टिकत नसेल तर ती अग्राह्य समजावी. मानवी अनूभवाचे विश्लेषण चिकित्सा करीतच दर्शनाची वाटचाल होत असते. ग्रीक जेव्हा रोमन साम्राज्याच्या अंकीत झाले तेंव्हा तर त्यांची स्वायत्तता आणि उपक्रमशिलता कायमचीच नष्ट झाली. वैयक्तिक साधनेचा आणि साफल्याचा एक प्रकार एवढेच बौध्दिक जीवनाचे स्वरुप उरले. शिवाय रोमन लोक जवळ जवळ सर्वस्वी व्यावहारिक कृतीचे होते. व्यवहारदक्ष असणे आणि व्यवहार निपूण असणे हे त्यांचे आदर्श होते. ह्या संकल्पनांचा नजिकच्या व्यवहारात उपयोग करुन

घेता येईल असे त्यांना दिसत असे पण संकल्पनांचा केवळ बौध्दीक पाठपुरावा करीत बसणे त्यांना बेजबाबदारपणाचे थील्लरपणाचे लक्षण वाटे म्हणून ते चांगले इंजिनिअर्स होत पण गणिती होत नसत. निसर्गाचा एक नवीन नियम ही शोधून काढू तर त्या आनंदापुढे साम्राज्य तुच्छ आहे. असे डेमॉक्रिटसचे वचन आहे. भूमितीतले एक कुट प्रमेय सोडवत असताना नगरावर हल्ला होऊन ते पडले आहे आणि सर्वत्र हल्लकल्लोळ उडाला आहे. याचे आर्किमीडीजला भान नव्हते. पण ते ग्रीक होते. आणि असे रोमन निपजले नाहीत तेव्हा सत्याच्या शोधाला वाहिलेल्या बौध्दिक जीवनात एक अंतीम साफल्य पाहणाऱ्या ग्रीक बौध्दिक परंपरेचे गांभीर्य आणि खोली रोमन काळात टिकली नाही. भोग, विलासात जीवन चालविणाऱ्या संपन्न उच्चवर्णीय लोकांच्या विनोदासाठी उपलब्ध असलेल्या एक सुसंस्कृत विलास एवढेच बौध्दिक साधनेचे स्वरुप राहिले.

प्रा.रेगे यांच्या मते रेनेंसामध्ये पुनरुज्जीवित झालेली बौध्दिक परंपरा आणि प्रॉटेस्टंटाची जाज्वल्य नैतिकता यांच्या मिलनातून विचारवंताचा उदय झाला आहे. प्रॉटेस्टंटाची नैतिकता जितकी प्रखर होती तितकीच कर्कश आणि एकाग्री होती ग्रीक बौध्दिक परंपरा आत्मसात केल्यामुळे तो अधिक तेज वाढले. सुसंस्कृत आणि सौम्य झाली. तिची धग कमी झाली असेल पण तिचे तेज वाढले या परंपरेविरुध्द ज्या अध्यात्मिक स्वातंत्र्याचा पुकारा त्यांनी केला होता. त्या स्वातंत्र्याचा बौध्दिक स्वातंत्र्य हा अविभाज्य भाग ठरला. स्वतंत्र बुध्दीने सत्य शोधून काढण्यात माणसाची सार्थकता आहे. सत्य शोधून काढणे ही त्याची जबाबदारी आहे. हे सर्व मान्य आहे पण त्याबरोबरच सत्याचा मानदंड लावून अनुभवाच्या आणि व्यवहाराच्या सर्व क्षेत्राची चिकित्सा करणे केवळ श्रध्देने स्वीकारलेल्या अध्यात्मिक मताचीच नव्हे तर रीती, राज्य संस्था आणि राज्य व्यवहार, आर्थिक व्यवहार इत्यादि सर्वांची चिकित्सा करणे आणि मूल्यमापन करणे हा सुध्दा ह्या जबाबदारीचा अटळ भाग मानण्यात येऊ लागला. चर्चेचे म्हणणे मानणार की ईश्वराने बायबलमध्ये सांगितलेले सत्य मानणार असा प्रश्न उपस्थित करुन प्रॉटेस्टटांनी बायबलच्या बाजूने कौल दिला होता. पण सत्य मानणार की बायबल मानणार असा प्रश्न उपस्थित करुन त्याच्या वंशजांनी तितक्या ज्वलंत निष्ठेने सत्याचा कौल दिला. ख्रिश्चन धर्म बुध्दीला विरोधी नाही हे दाखवून देण्याचे प्रयत्न होऊ लागले होते. ह्याचा अर्थ असा की तो बुध्दीला विरोधी असेल तर टिकू शकणार नाही हे मान्य होते. शिवाय ह्या बौध्दिक परिक्षणामुळे पारंपारिक सामाजिक संस्थात जर काही उणीवा, विकृती, दोष आढळल्या तर ह्या संस्थांत आवश्यक ते परिवर्तन घडवून आणावयाची नैतिक जबाबदारी ही विचारवंतांना आता येण्या जोगी नव्हती. कॅथॉलिक चर्चने सीझरशी तडजोड केली आणि अनेकदा त्याच्यावर कुरघोडीही केली. आत्मा कदाचित गमावला पण मूळची सत्यावरील प्रखर नैतिक निष्ठा प्रॉटेस्टंट पंथाच्या रुपाने परत उफाळून आली संपन्न बलशाली जीवनाच्या सर्व क्षेत्रांना व्यापून उरलेल्या ईश्वराच्या चिरंतन सत्तेचे पृथ्वीवरील प्रतीक असलेल्या आणि म्हणून दिव्यत्वाचा वारसा सांगणाऱ्या चर्चेशी सत्य धर्मावरील अत्यतिंक एकनिष्ठेमुळे प्रॉटेस्टटांनी मोडतोड केली. ही मोडतोड करणे आणि आपल्याला सापडलेल्या सत्याच्या आधारावर वैयक्तिक आणि सामुदायीक जीवनाची पुनर्रचना करणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले आणि त्यासाठी पुष्कळ किंमतही दिली कसा यावर योतना भोगत मेलेला ख्रिस्त जर ईश्वराच्या मानवावर असलेल्या प्रेमाचे प्रतिक असेल. तर खांबावर जिवंत जळलेला प्रॉटेस्टंट माणसाच्या सत्यावरील निष्ठेचे प्रतीक आहेत. प्रॉटेस्टंटानी एक गोष्ट इतिहासात स्पष्टपणे दाखवून दिली. परमेश्वराला अनुसरण्यात प्रामाण्य नाही. परंपरेने प्रामाण्याला अनुसरले पाहिजे नाही तर ती परंपरा नष्ट केली पाहिजे.

विज्ञानाच्या विकासासबरोबर वैज्ञानिक रीतीचे स्वरुप झाले आहे. वैज्ञानिक रीतीच्या किंवा बुध्दीच्या निकषावर जे टिकून राहील तेच सत्यज्ञान होय. निसर्ग आणि निसर्गाचा घटक असलेला मानव हा त्या ज्ञानाचा विषय होय. ज्ञानाचा उगम वस्तूस्थितीचा असतो. वस्तूस्थितीच्या ज्ञानाचा अनुभव हाच निकष अनुभवानेच वस्तूस्थितीच्या रहस्या भेद करता येतो. वैज्ञानिक पध्दतीत व्यक्तीमत्व, अनुभव, पूर्वग्रह निरपेक्षतेने वस्तुस्थिती जशी असेल तसे मान्यकरावे आणि तिचे निरीक्षण, प्रयोग, वर्गीकरण, कल्पना, सिध्दांत व तिचा पडताळा अशा अनेक प्रकारच्या प्रक्रियेतून शेवटी सुव्यवस्थित ज्ञान प्राप्त होते.

विगमन व निगमन अशा दोन प्रकारच्या विचार पध्दती आहेत. या प्रक्रियेत विवक्षीत घटनेपासून सामान्याकडे विचाराची प्रक्रिया असते. विगमनाचे निर्णय शेवटी संभाव्यच असतात. निसर्गएकविधता, कार्यकारणाचा नियम हा विगमनांचा आधार आहे. पण ही दोन्ही तत्वे मानवी श्रध्देचा आधार आहेत. ही पध्दती शास्त्रीय पध्दतीचे एक अंग आहे. बुध्दीने प्रकाशित केलेल्या सामान्य तत्वापासून विवक्षीत वस्तूस्थितीचे यात निगमन करता येते. सामान्य तत्वापासून विवक्षीत वस्तूस्थितीबद्दल निर्णय करण्यात येतात.

वैज्ञानिक रितीने जे ज्ञान प्राप्त होते त्या ज्ञानाला वस्तुस्थितीचा भरभक्कम आधार प्राप्त होतो आणि त्यावरच प्रबोधन आधारलेले होते ज्याला आपण बुध्दीवाद म्हणतो. तो ह्या ज्ञानामुळे स्थिर होऊ शकला विद्याने पुरेशा पुराव्यावरच सत्य म्हणून सिध्द होतात. पुरेशा पुराव्याच्या आधारावर नसलेले विधान असत्य ही भूमिका स्विकारणे म्हणजे बुध्दीवाद होय. सगळीच सत्ये वैज्ञानिक सत्ये नसतात. उदा : माणूस आणि मानवी समाज या विषयीची सत्ये वैज्ञानिक नसताना वैज्ञानिक रितीचा अवलंब करुन ती शोधुन काढता येत नहीत. विज्ञानाने शोधून काढलेल्या कार्यकारण नियमाच्या स्वरुपाची ती नसतात हे आपण पाहिजे अशा सत्यांना पुराव्याचा आधार लागत नाही. अंतरदृष्टीने वगैरे त्याचे ज्ञान आपल्याला होते असे नाही एखादी गोष्ट आपल्याला सत्य वाटते किंवा ती गोष्ट एखाद्या अधिकारी व्यक्तीने ती सत्य आहे असे घोषित केली आहे असे ठरवायला पुरेसा पुरावा नसतो ह्या कारणांमुळे ती गोष्ट संभवनीय ठरेल ती आहे हे प्रस्थापित करण्याला योग्य त्या पुराव्याच्या निकषावर तिचे परिक्षण करावे लागते. रेगे यांच्या मते विज्ञान पूर्व काळात हा बुध्दीवाद दृष्टीकोन अस्तित्वात नव्हता असे नाही त्याचे अस्तित्व तुटक आणि भंगूर होते. सूव्यवस्थित वस्तुस्थिती पुढे टिकाव धरणारे तिला सुसंगतपणे एका सुत्रात ओवणारे विधान निर्माण होईपर्यंत केवळ आपणास बुध्दीच्या जोरावर ज्ञान मिळविण्याची ईर्षा व माणसाचा अभिमान वृथा ठरत होता. विज्ञानानंतर बुध्दीच्या साह्याने सत्य शोधण्याचा प्रयत्न करणे आणि जे सत्य म्हणून प्रस्थापित झालेले नाही त्याचा स्विकार न करणे हा माणसाचा अधिकार ठरला. तिच त्याची जबाबदारी ठरली. मानवजात प्रौढ ठरली, मानवाला सत्य सापडले तेव्हा त्याला विश्व दुरावले. धार्मिक श्रध्देच्या डोळयाने जेव्हा तो विश्वाकडे पाहत होतात तेव्हा ते त्याचे घर होते. वस्तुस्थिती जशी असेल तशी समजून घेतली पाहिजे हे माणसाला जेंव्हा कळाले तेंव्हा त्यांचा भोळा भाव हरपला. विश्व मनापासून अलग झाले. ह्या परक्या विश्वात त्याने आपल्या हिंमतीवर घर बांधावे हे त्याला समजले. विस्ताराचा मुक्त आनंद घेणे ही विचारवंताच्या प्रवृत्तीचा एक भाग आणि ह्या संकल्पनाचा उपयोग प्रत्यक्ष जीवनाच्या चिकित्सेसाठी करणे हा दुसरा भाग हे काम अर्थात गंभीरपणाने केले पाहिजे. प्रत्यक्ष जिवनाची चिकित्सा म्हणजे प्रचलित सामाजिक संस्था आणि व्यवहार नितीमूल्य, राजकीय कार्यक्रम, कला आणि साहित्यातील प्रकृती, विज्ञानाची अवस्था जीवनाच्या भौतिक उणीवा कोणत्याही अंगाची चिकित्सा असते चिकित्सा म्हणजे मूल्यमापन असते स्थिरावलेल्या व्यवहाराला आणि त्याच्या गृहीत कृत्यांना जडलेल्या सामाजिक सवयींना चिकित्सेचे आव्हान असते असे रेगे यांना नेहमीच वाटत आले आहे.

आधुनिक तत्वज्ञानात अर्थ म्हणजे काय हा प्रश्न तत्वज्ञानातील अनेक महत्वाच्या प्रश्नापैकी एक समजला जातो. या प्रश्नाची खूप चर्चा झाली. अर्थविषयीच्या अनेक तात्वीक उपपत्ती अनेक विचारवंतांनी त्या प्रभावी सोडवणूक करण्यासाठी स्पष्ट केलेल्या आहेत त्यापैकी आदर्शवादी कारक सवेदक उपपती इत्यादी परंतू ह्यापैकी एकही उपपत्ती तत्वज्ञानाच्या दृष्टीने तितकीशी तर्कशुध्द नाहीत तार्किकदृष्ट्या ह्या उपपत्ती विसंगत आहेत. विसाव्या शतकात कार्नाप, रसेल, राईल, ऑस्टीन, विटगेनस्टाईन यांनी पण अर्थाची उपपत्ती एक तात्वीक उपपत्ती मांडली आहे. त्यापैकी विटगेन्नटाईन यांचा दृष्टीकोन सध्यातरी तत्वज्ञानात मान्य झालेला दिसतो. त्याच्या मते शब्दाचा अर्थ काय हा प्रश्न विचारणेच चूक आहे. असा प्रश्न विचारण्याऐवजी भाषेत विवक्षीत शब्दांचा वापर कोणकोणते कार्य पार पाडण्यासाठी केला जातो. हा प्रश्न विचारणेच तात्वीकदृष्ट्या योग्य ठरते सारांश एखाद्या शब्दाचा अर्थ काय ? ह्या प्रश्नाचा आशय या शब्दाने कोणती कल्पना किंवा वस्तूस्थितीचा कोणता घटक

निर्दीष्ट होतो असा न करता हा शब्द वेगवेगळ्या संदर्भास कोणकोणती कार्य करण्यासाठी वापरला जातो असा केला पाहिजे. ह्याला तत्वज्ञानातील नवीन पंथाची भूमिका सर्वसाधारणपणे कशी मांडता येईल. देनंदिन जीवनात रोजच्या व्यवहारात आपण अनेक कारणांसाठी भाषा वापरतो भाषिक प्रयोगाद्वारे आपण अनेक कार्य पार पाडतो. मराठी भाषा एखाद्याला अवगत आहे किंवा नाही हे आपण कसे ठरवितो ? भाषेच्या साह्याने जो विविध कार्य पार पाडता येतात ती जर तो मराठीत सुरळीतपणे पार पाडीत असेल, जर वेगवेगळ्या संदर्भात वेगवेगळ्या परिस्थितीत योग्य ते वापरुन आपली उद्दिष्टे साध्य करुन घेऊ शकत असेल तर त्याला मराठी भाषा अवगत आहे. असे आपण समजतो.

भाषा हे एक हत्यार आहे. एक अवजार आहे. भाषेचे ज्ञान असणे म्हणजे भाषा वापरण्याची वैशिष्ट्ये अंगी असणे होय. अनेकदा असे मानले जाते की, एखाद्या शब्दाचा किंवा प्रयोगाचा अर्थ म्हणजे तो शब्द किंवा तो शब्द उच्चारला असता आपल्या मनात जी कल्पना उभी राहते ती होय. ज्याप्रमाणे बॅगेला लेबल लावावे. ज्याप्रमाणे वस्तूला किंवा कल्पनेत एका शब्दाचे किंवा शब्द प्रयोगाचे लेबल लावलेले असते त्या शब्दाचा अर्थ जर माहित असेल तर तो शब्द उच्चारला जाताच त्या शब्दांशी संलग्न असलेली कल्पना आपल्या मनात उभी राहील जर त्या शब्दाचा अर्थ आपल्याला नीट ठाऊक नसेल तर, तो शब्द ऐकून किंवा वाचून आपल्या मनात कोणतीच कल्पना उभी राहणार नाही किंवा कोणती तरी कल्पना उभी राहील एखाद्या शब्दाची व्याख्या करावयाची झाल्यास त्या शब्दाशी संलग्न असलेली आपल्या मनातील कल्पना काळजीपूर्वक निरखून पाहावी लागेल व ती मिश्र अनेक अवयवांची बनलेली असल्यास तिचे हे वेगवेगळे अवयय सुटे करुन ते कोणत्या रितीने एकत्र केल्यावर ही कल्पना प्राप्त होते हे दाखवून द्यावे लागेल. ती कल्पना जर केवळ कल्पना असेल तर त्या वस्तूचे किंवा ज्या गुणांचे तो शब्द लेबल त्या वस्तूकडे किंवा गुणाकडे बोट दाखवून त्या शब्दाचा अर्थ स्पष्ट करता येईल. परंतू त्या भाषा विश्लेषवादी पंथाच्या दृष्टीने भाषेच्या अर्थविषयीची ही उपपत्ती समूळ चूक आहे. भाषा अवगत असणे म्हणजे भाषेतील शब्द व शब्दप्रयोग यांच्याशी संलग्न असलेल्या विविध कल्पनांचा आपल्या मनात एकच साठा असणे नव्हे तर शब्दाचा अर्थ स्पष्टपणे करणे म्हणजे त्या शब्दाशी संलग्न असलेल्या कल्पनेचे विश्लेषण करणे नव्हे, तर तो शुध्द वेगवेगळ्या संदर्भात कोणत्या विविध कार्यासाठी वापरण्यात येतो हे दाखवून देणे म्हणजेच त्या शब्दाचे विविध उपयोग स्पष्ट करणे होय.

भाषेत नामे, विशेषणे, क्रियापदे वगैरे कोणत्याही वेगवेगळ्या शब्दांची कशा रीतीने रचना केली असता वाक्याला अर्थपूर्णतः प्राप्त होते. ह्या संबंधीच्या सामान्य नियमाला Syntax असे म्हणतात. वाक्याची अर्थपूर्णतः त्या वाक्याच्या रचनेवर अवलंबून असते. कोणत्याही वाक्याला अर्थ पूर्ण लावायचा असेल तर त्या वाक्याची रचना Syntax योग्य असला पाहिजे. ज्या तत्वाचा पडताळा बुध्दीद्वारा करता येतो अशाच तऱ्हेच्या ज्ञानाला प्रमाण ज्ञान म्हणता येते. अशी बुध्दीवादी पंथाची भूमिका आहे ज्ञानाचे एकमेव साधन बुध्दी हेच होय. बुध्दीद्वारे होणारे विश्वाचे ज्ञानच मानवाला प्रमाण ज्ञानाचे समजले जाते. असा प्रश्न निर्माण होतो की, जे ज्ञान सामान्य आणि अपरिहार्य असते अशा ज्ञानाला ही संज्ञा दिली जाते. अशाप्रकारचे सामान्य ज्ञान सर्व देशकाल निरपेक्ष सत्य असते. अशा ज्ञानांनी सत्यता देशकाला याने मर्यादित असते. २२ १/१-४ अशा प्रकारचे ज्ञान बुध्दीनेच होते. गणित भूमिती ईत्यादि शास्त्रातील ज्ञान यथार्थ ज्ञान असते.

वैज्ञानिक ज्ञानामुळेच ज्याला आपण बुध्दीवाद म्हणतो तो स्थिर होवू शकला. पूराव्याच्या आधारेच विधाने सत्य म्हणून सिध्द होतात आणि म्हणून पुरेशा पुराव्याचा अभाव असलेले विधान सत्य म्हणून मान्य करावयाचे नाही. अशी भूमिका स्वीकारावी म्हणजे बुध्दीवाद स्वीकारणे होय. बुध्दीवाद केवळ तत्वज्ञानापुरता मर्यादीत न ठेवता जिवनाच्या प्रत्येक अंगाची चिकित्सा मग ती भौतिक अंगाची असो किंवा सांस्कृतिक अंगाची असो त्याची चिकित्सा करीत असताना बुध्दी प्रामाण्यानुसरुनच झाली नाही. आपली सांस्कृतिक मुल्ये, इतिहास मीमांसा, सध्या उपलब्ध असलेल्या बुध्दीच्या ज्ञानाच्या प्रकाशात केली पाहिजे. जर बुध्दीप्रामाण्यावर ते सर्व टिकत असेल तरच त्याचा स्वीकार आणि जर ते टिकत नसेल तर ते नष्ट केले पाहिजे. भारतीय तत्वज्ञानाने बुध्दीचा स्वतंत्र ज्ञानाचे साधन अशा प्रकारचा दर्जा मान्य केलेला नाही. त्यामुळे

भारतीय तत्वज्ञानात तत्त्वज्ञानाच्या स्वतंत्र पध्दतीचा विकास होऊ शकला नाही. चिकित्सेमुळे माणूस अंधश्रध्देच्या आणि जीर्ण परंपरेच्या जोखडातून सुटू शकतो आणि वस्तूस्थिती जशी असेल तशी तिचा स्वीकार करुन तिचे ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करतो आणि ज्ञानाच्या जोरावरच तो अधिक कल्याणकारक जीवन मार्गाच्या सीमारेषा आखु शकतो आणि पाहिजे तशा प्रकारच्या सामाजिक जीवनाची पुनर्रचना करु शकतो.

साऱ्याच गोष्टी, आपली मते, आपले विश्वास, नैतिक कल्पना, चालीरीतींनी बुध्दीच्या निकषावर पारखुन घेतल्या पाहिजे ही एनलायटन मेन्टची मुलभूत भुमिका होती. वैज्ञानिक उपपत्ती ग्राह्य असतात. कारण त्या बुध्दीच्या निकषावर उतरलेल्या असतात आणि मानवी व्यवहाराच्या सर्व क्षेत्रांत ग्राह्यग्राह्य ठरविण्यासाठी हेच निकष वापरले पाहिजेत. असा हा तत्वज्ञानाचा आग्रह होता मानवी बुध्दी सर्वत्र एकच असते आणि मानवी प्रकृतीही सर्वत्र एकच असते. म्हणजे मानवी प्रवृत्ती सर्वत्र सारख्या असतात. ह्या प्रवृत्तीच्या कमाल समाधानात माणसाचे कल्याण असते आणि हे समाधान यशस्वी रीतीने कसे साधायचे हे बुध्दीकडून आपल्याला कळते. तेंव्हा माणसाचे कल्याण साधणारी आणि म्हणून सर्वत्र प्रमाण असणारी एक सार्वत्रीक संस्कृती असते आणि ती बुध्दीवर अधिष्ठीत असते. असे ह्या तत्वज्ञानाचे सार होते. वैज्ञानिक रीतीमध्ये हे बुध्दीचे स्वरुप स्पष्ट होते. हा विश्वास ही ह्या भुमिकेचा एक भाग होता, वैज्ञानिक रीतीचे स्वरुप जसे स्पष्ट झाले, तशा तिच्या व्याप्तीच्या मर्यादाही स्पष्ट झाल्या. उदाहरणार्थ इम्यान्युएल कॉन्टच्या तत्वज्ञानात या मर्यादा चांगल्या स्पष्ट केलेल्या दिसतात. कार्यकारण भावाच्या तत्वाच्या आधारे सृष्टीत घडणाऱ्या घटनांची उपपत्ती आपण विज्ञानात लावतो. आणि निरीक्षणाच्या कसोटीला उतरणे ही ह्या उपपत्ती प्रमाणे असण्याची आवश्य अशी अट आहे. माणुस त्याचे शरीर आणि मानसिक व्यवहार हा सृष्टीचा एक भाग आहे. आणि वैज्ञानिक उपपत्तीच्या साह्याने याचे स्पष्टीकरण करता येते. पण वैज्ञानिक ज्ञानाचा निमित्त झाला हे माणसाचे स्वरुप उतरतेच आणि ते वैज्ञानिक ज्ञानाच्या पलिकडे असते. आता माणसाचे हे ज्ञानपण म्हणजेच वस्तूंना दृश्य करणारा एक अमूर्त प्रकाश एवढेच असते असे म्हणता येईल. पण एवढ्याने भागत नाही, माणूस ज्ञानी आहे. त्याचप्रमाणे कर्ताही आहे आणि त्याचे कर्तेपणाही वैज्ञानिक ज्ञानाच्या अलिकडे आहे कारण माणूस नैतिक बंधने स्वीकारतो म्हणजे तो स्वतःला नैतिक आदेश देतो. हे आदेश त्याला सृष्टीत सापडू शकत नाहीत. फारतर कसे वागले असता आपल्याला प्रवृत्तीचे समाधान करता येईल हे त्याला नैसर्गिक घटनांच्या अवलोकनाने समजू शकेल. पण कोणत्या प्रवृत्तीचे समाधान करणे अयोग्य आहे त्याचा निकष त्याला लाभू शकेल पण हा निकष त्याला स्वतःला घ्यावा लागेल. त्या प्रमाणे असे आदेश त्याला स्वतःला घ्यावे लागेल ह्याच्यात माणसाच्या नैतिक जीवनांची स्वायत्तता असते.

वरील विश्लेषणापासून आपणास प्रामाण्य काय असते याची कल्पना येते. या संदर्भात प्रत्येक धर्मांत असलेले युक्तिवाद आपण तपासून घेतले पाहिजे मग ते हिंदूंचे असोत किंवा कुराण बायबल असो सर्व धार्मिक व प्रमाण ग्रंथातील युक्तिवादाची तपासणी तार्किक दृष्टीकोणातून केल्यास त्याचे स्वरुप आत्मविसंगत असेल दिसून येईल. ब्रम्हसुत्र, गीताभाष्य, वेद, पुराण, कुराण या सर्व प्रमाण ग्रंथातील यूक्तिवाद जर प्रमाण असेल तर तो आकार आपण प्रमाण समजावा. वेदात जे कांही सांगितले ते केवळ वेदात आहे म्हणून प्रमाण होऊ शकत नाही जर तो प्रमाणे असेल आणि विचाराच्या सुसंगतीचे नियम झालेले असेल तर तो युक्तिवाद हा प्रमाण युक्तिवाद ठरतो. त्यातील सत्याचे स्वरुप जर शास्त्रीय ज्ञानांच्या कसोटीवर टिकत असेल तरच त्यास आपण सत्य हे विधेय लावणे योग्य ठरते.

सध्याची कल्पना काही वैयक्तिक स्वरुपाची नसून ती सार्वत्रिक आहे. सत्य सर्वासाठीच सत्य असते. परंतू याचा कोणी असा समज करुन घेऊ नये जे काही सार्वत्रिक असेल ते सत्य असेलच आपणास भाकीत धरणे कठीण ठरते. सत्याच्या अनेक कल्पना आहेत. वैयक्तिक आणि सार्वत्रिक पण सत्य हे सत्यच असते. ते कांही वैयक्तिक किंवा सार्वत्रिक असत नाही. तो विज्ञानाचा गुण आहे. विधाने ही वस्तुस्थितीच्या संदर्भात केलेले असतात. वस्तुस्थितीच्या निकषावरच विधान सत्य किंवा असत्य आहे हे आपणास ठरविता येतो. सत्य सर्वांना सारखेच समजते. वेदात जी विधाने केलेली आहेत

ती विधाने किंवा ते ज्ञान त्या काळातील जानकार लोकांची विश्वविषयक मते, धारणा त्या काळात त्यांना विश्वविषयक जे कांही ज्ञान उपलब्ध झाले होते त्याच आधारावर त्यांनी त्यांची बनविली होती. परंतू मानवी ज्ञानात सतत वाढ होत आहे. ज्ञानाच्या वाढी बरोबरच आपण आपल्या समजुती बदलून घेणे हेच योग्य ठरते. वेदात ऋषीने स्वतः च्या अनुभवाचा आणि त्या काळात उपलब्ध असलेल्या विश्वविषयक ज्ञानाचा आधार घेऊनच, विश्वाचे स्वरुप काय असते ? माणसाने कसे वागावे ? या प्रश्नांची तांत्रिक स्वरुपात मांडणी न करता सुत्राच्या स्वरुपात विश्वविषयक उपपत्ती सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यातील काही भाग जर आजच्या ज्ञानाच्या प्रकाशात टिकत असेल तर ते योग्य समजावे, व तेवढ्यापुरते ते वेद प्रमाण समजावे, ते विधान जर निकषावर पारखून घेतल्यास जर ते सत्य ठरत असेल तरच ते विधान सत्य समजावे. अशा दृष्टीकोणातून सर्व धार्मिक ग्रंथाकडे पाहिजे पाहिजे. तर तो ग्रथ असेल तर त्या ग्रंथास ग्रंथकर्ता असला पाहिजे. यानुसार सर्व धर्मग्रंथ सर्वश्रेष्ठ अशा व्यक्तींनी लिहिले आहेत. व्यक्ती कितीही श्रेष्ठ असली तरी त्या व्यक्तीस झालेले ज्ञान कांही त्रिकाल सत्य असू शकत नाही. काही ज्ञान सत्य असेल तर ते सत्य मानावे. या पध्दतीनूसार वेद प्रमाणाचे स्वरुप असले पाहिजे. नाही तर वेद प्रामाण्य नष्ट केले पाहिजे.

भारतीय जीवन पध्दतीला तांत्रिक भाषेत पुरुषार्थ ही संज्ञा आहे. पुरुषार्थाची कल्पनाही, मानवी जीवन विषयक भावात्मक दृष्टीकोण व्यक्त करते. ध्येयाची अनेकता या जीवन पध्दतीला मान्य आहे. परंतू त्याचा क्रम आणि विषयाची तांत्रिक उपपत्ती देणे जरा कठीण वाटते. संपत्ती इतर साध्य करावयाचे झाल्यास साधन म्हणून त्यास साधन मूल्यांचे स्वरुप प्राप्त होते. कोणत्याही सुसंस्कृत वं समृध्द समाजासाठी व त्याच्या स्थैर्यासाठी ध्अर्थङ या मूल्याची आवश्यकता असते मूल्यांच्या चौकटीत अर्थाला दुय्यम दर्जाचे स्थान देण्यात आले आहे. समाजाच्या धारणेसाठी आकारबध्द जीवनाची आवश्यकता असते. या चौकटीत राहूनच अर्थ आणि इतर ध्येयाची प्राप्ती शक्य होते. धर्म हा सुखसंपन्न जीवन जगण्यासाठी व्यक्तीच्या गटासाठी आवश्यक ठरते. धर्मामुळे अर्थ आणि काम या दुय्यम ध्येयाची प्राप्ती होते. या संदर्भात जेव्हा आपण मोक्ष या संकल्पनेचा स्विकार करतो तेंव्हाच खरी अडचण निर्माण होते. मोक्षाला इतर मानवी ध्येयात सर्वश्रेष्ठ असे स्थान देता येत नाही. जर आपण मोक्षाला सर्वश्रेष्ठ मानवी ध्येय अशी मान्यता दिल्यास ते विसंगत दिसते. त्यासाठी मानवी नैसर्गिक प्रकृतीचा त्याग करावा लागतो. हे येथे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, भारतीय तत्वज्ञानात आणि नीतीशास्त्रात मानवाच्या नैसर्गिक प्रवृत्तीच्या समाधानाचे महत्व व मान्य करण्यात आलेले आहे. अभ्युदय हा जीवनाच्या भौतिक अंगाच्या समृध्दीचे लक्षण आहे. त्याचप्रमाणे मुक्ती आणि जीवनातील सर्वोच्च ध्येय याचा दर्जा समान मान्य करण्यात आला आहे. पण दोन संकल्पनांची भेसळ करता काम नये ते दोन स्वतंत्र ध्येय आहेत.

अनुभव हाच प्रमाण ज्ञानाचे साधन आणि निकष समजला जातो त्यातून जे ज्ञान प्राप्त होते. त्यातूनच वैयक्तिक आणि सामाजिक जीवनाचे स्वरुप स्पष्ट होते. कशा प्रकारे जमले असता मानवी जीवन कल्याणकारी होईल याचा अंदाज उपलब्ध असलेले विश्व विषयज्ञान आणि मानवी प्रकृतीचे स्वरुप आणि मानवी इतिहासात व्यक्त झालेली मानवी मूल्ये यांच्या आधारावरच सामाजिक जीवनांची पुनर्रचना शक्य होते. यासाठी अनुभव प्रामाण्यांची भूमिका जेथपर्यंत उपयोगी तेथपर्यंत स्विकारणे हे मानवी कल्याणाचे आहे. वेद, पुरांण, गीता, उपनिषदे, कुराण, बायबल इत्यादी धार्मिक ग्रंथांना व परंपरेला अनुसरुन जे निर्णय घेण्यात आल्यास त्या निर्णयाचे प्रामाण्य सिध्द होते. पुराव्याचा आधार लागत नाही. अर्थदृष्टीने वगैरे यांचे ज्ञान आपल्याला होते असे नाही एखादी गोष्ट आपल्याला सत्य वाटते किंवा ती गोष्ट एखाद्या अधिकारी व्यक्तीने ती सत्याचे परिक्षण करावे लागते. रेगे यांचे अस्तित्व तुटक आणि भग्न होते सुध्यावस्थित, वस्तुस्थितीपूढे टिकाव धरणारे ति सुसंगतपणे एका सुत्रात ओळखणारे विलग्न निर्माण होईपर्यंत केवळ आपणास बुध्दीच्या जोरावर ज्ञान मिळविण्याची ईर्षा व माणसांचा अभिमान वृथा ठरत होता. विज्ञानानंतर बुध्दीच्या साह्याने सत्य शोधण्याचा प्रयत्न करणे आपली जे सत्य म्हणून प्रस्थापित झालेले नाही त्याचा स्विकार न करणे माणसांचा हा अधिकार ठरला, तीच त्याची जबाबदारी ठरली. मानवजात

प्रौढ मानवाला सत्य सापडले तेंव्हा त्यावर विश्व दुरावले. धार्मिक श्रध्देच्या डोळ्याने जेव्हा तो विश्वाकडे पाहत होता तेव्हा ते त्याचे थर होते. वस्तुस्थिती जशी असेल तसे समजून घेतली पाहिजे हे माणसालाही जेंव्हा कळाले तेंव्हा त्याचा भोळा भाव हरपला. विश्व मनापासून अलग झाले. ह्या परवाच विश्वात त्याने आपल्या दिमतीवर घर बांधणे हे त्याला समजले. गोष्टी घडवून आणण्यापेक्षा गोष्टी समजावून घेण्याची विचारवंताची प्रवृत्ती असते. संकल्पना व उपपत्ती ह्याविषयी इतरांच्या मानाने त्यास विलक्षण आस्था असते. प्रसंग घडला की, कार्यतत्पर होण्याऐवजी त्याचे कार्य शोधून काढण्याकडे त्याचा कल असतो. करावयाची झाल्यास त्या शब्दाशी संलग्न असलेली आपल्या मनातील कल्पना काळजीपूर्वक पाहावी लागेल व ती मिश्र अनेक अवयवाची बनलेली असते. त्यास तिचे हे वेगवेगळे अवयव सुटे करु नये.

अनुभव हेच प्रमाण साधन आणि निकष समजला जातो. त्यामुळेच कोणत्याही बाबींचे सत्यत्व शेवटी अनुभवानेच सिध्द करावे लागते त्यातून ते ज्ञान होते. त्यामुळे वैयक्तिक व सामाजिक जीवनाचे स्वरुप स्पष्ट होते आणि कसे जमले असता मानवी जीवन अधिक कल्याणकारी होईल याचा अंदाज उपलब्ध असलेले ज्ञान, मानवी प्रकृतीचे स्वरुप, मानवाचे इतिहासात व्यक्त झालेले शुल्य याच्या आधारावरच सामाजिक जीवनाची पुनर्रचना करता येते. यासाठी अनुभवप्रामाण्याची भूमिका येथपर्यंत उपयोगी आहे. तेथपर्यंत स्विकारणे हे मानवी प्रगतीचे गमक आहे. वेदाना, धर्मग्रंथांना, परंपरेला अनुसरुन निर्णय घेण्यात प्रामाण्य नसते तर प्रामाण्याला अनुसरण्यातच त्याचे प्रामाण्य असते. मानवी ज्ञानाच्या विकासात संकल्पनाचे कार्य निर्णयात्मकपणे महत्वाचे आहे. संकल्पना ह्या अनेक घटकांच्या मिळून बनलेल्या असतात. त्यांची रचना तार्किक असते. त्यासाठी काही तर्कशास्त्राचे नियम पाळावे लागतात.

संकल्पनाना हातपाय असतात असे हेंगलेंने म्हटले आहे. म्हणजे संकल्पना इकडून तिकडे भटकतात संकल्पनांच्या हालचाली ज्याच्या मनात सुरु होतात ते विगाखे. आता संकल्पनांना ताणून अधिक सामान्य स्वरुप देण्याची काही मोजक्या संकल्पनाच्या साह्याने संबंध अस्तित्वाचा उलगडा करण्याची प्रवृत्ती तत्ववेत्या मध्ये आढळते संकल्पनांच्या साह्याने समग्र विश्वाची बौध्दीक उपपत्ती लावणे हे तत्वज्ञानाचे एकमेव उद्दीष्ट असते विचारवंतांची बौध्दिक प्रेरणा ही तार्किक प्रेरणेला बरीचशी जवळ आहे. प्रा.मे.पू.रेगे सरांचे तत्वज्ञान, धर्म, विज्ञान, भाषा, अनुभववाद या संकल्पनांचे विश्लेषण वरील प्रमाणे केले आहे.

**संदर्भ सुची :**

**प्रा.मे.पु.रेगे यांचे निवडक लेख खालील प्रमाणे.**

१) Some Reflections on Indian philosophical tradition - Quest, १९७४.

२) Humanism and Hindu Tradition, Quest, १९७७.

३) Idealism and Metaphysics, I.P.Q.-१९८९.

४) गांधीजी आणि बदलती मुल्ये - नवभारत - Jan. १९७०.

५) अनामिकाची चिंतणिका-नवभारत मे-१९७२.

६) बर्ट्रांड रसेल यांचे तत्वदर्शन-सत्यकथा-जाने - १९६५.

७) जी. ई. मूर - सत्यकथा, १९५९.

८) विचारवंताचे जग : व्याख्या आणि व्याप्ती - मौज-१९६८, दिवाळी अंक.

९) रुपवेध - सत्यकथा- जाने. १९६८.

१०) ऐहिक निष्ठा आणि सामाजिक मुल्ये-संक्रमण काळाचे आव्हान-संपा.भा.सं.भणगे.

११) प्रबोधनाचे स्वरुप, भारतीय प्रबोधन-१९७२.